# सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर

113 (अ), सिद्धेश्वर पेठ (एस.बी.आय. ट्रेझरी शेजारी) सोलापूर - 413 001.


---

**दिनांक : २८/०३/२०२४**

## महत्वाची सूचना

**जाहिरात कोड : पी-100** **पदाचे नाव : लिपिक** **परीक्षा दिनांक : 03 मार्च 2024.**

दि.3 मार्च 2024 रोजी लिपिक पदासाठी परीक्षा घेण्यात आलेली होती. त्यास अनुसरून पात्र असलेल्या उमेदवारांची मौखिक मुलाखत दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड (शेड्यूल्ड बँक) येथे दि. 19, 20 आणि 21 मार्च 2024 रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

लेखी परीक्षा (100 गुण) आणि मौखिक मुलाखत (10 गुण) यामध्ये मिळालेले एकत्रित गुण विचारात घेऊन अंतीम गुणवत्ता यादीमधील पहिल्या 110 उमेदवारांची यादी https://surbanksassociations.com या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच, गुणवत्ता यादीमधील पुढील 22 उमेदवारांची प्रतिक्षा यादीदेखील स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून उमेदवारांना खालील सूचना देण्यात येत आहेत.

1) अंतीम गुणवत्ता यादीमधील पहिल्या 110 उमेदवारांना दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड (शेड्यूल्ड बँक) यांचेतर्फे प्रशिक्षणार्थी लिपिक म्हणून नियुक्तीपत्रे दि.20 एप्रिल 2024 पर्यंत पाठविण्यात येतील. पात्र उमेदवारांना काही कारणाने नियुक्ती पत्राची प्रत न मिळाल्यास दि.25 एप्रिल 2024 पर्यंत उमेदवारांनी बँकेकडे संपर्क साधणे बंधनकारक राहील. त्यानंतर याबाबतच्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
2) बँकेने दिलेल्या नियुक्तीपत्रात नमूद दिनांकास उमेदवाराने नेमून दिलेल्या शाखेत/मुख्य कार्यालयात हजर होणे बंधनकारक राहील; नेमून दिलेल्या दिनांकास उमेदवार हजर राहिला नाही तर त्यास नोकरीची गरज नाही असे समजून त्याची नियुक्ती आपोआप रद्द होईल.
3) प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनी असोसिएशन किंवा बँक यांच्याकडे वारंवार वा परस्पर संपर्क साधू नये. प्रथम 110 उमेदवारांपैकी उमेदवार हजर न झाल्यास अगर बँकेस जादा लिपिक उमेदवाराची गरज असल्यास बँक प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणानुक्रमानुसार नेमणूकपत्र देईल.
4) बँकेने दिलेल्या नियुक्ती पत्रातील सर्व अटींचे पालन करणे उमेदवारांना बंधनकारक राहील. तसेच नियुक्तीपत्रातील अटी/नियमांची पूर्तता बँकेने निर्धारित केलेल्या कामावर हजर होण्याच्या दिनांकापर्यंत न झाल्यास दिलेले नेमणूक रद्दबातल ठरेल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर